(इंग्रजी टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

**मुंबई उच्च न्यायालयातील**

**फौजदारी अपीलीय अधिकारितेतील**

**फौजदारी अपील क्रमांक १००७/२०१८**

एकनाथ कृष्ण कदम
वय : २७ वर्षे, धंदा:
रा: खोली क्रमांक ३,निधी निवास,
सिद्धार्थ नगर, गावदेवी रोड,
भांडुप (प.), मुंबई
(सध्या आरोपी नाशिक .... अपीलकर्ता / अर्जदार
रोड मध्यवर्ती कारागृह, नाशिक येथे आहे) (मूळ आरोपी)

विरुद्ध

महाराष्ट्र राज्य यांच्यातर्फे
पोलिस निरीक्षक वर्सोवा पोलीस स्टेशन,
मुंबई सी.आर.क्र.२२१/२००८. ... उत्तरवादी
(मूळ फिर्यादी)

श्री पवन माळी, (विधी सहाय्य सेवांद्वारे नियुक्त), अपीलकर्ता / अर्जदारासाठी.

श्री.के. व्ही. सस्ते, उत्तरवादी-राज्याच्या वतीने अतिरिक्त सरकारी वकील

**न्यायमंच : न्या.रेवती मोहिते डेरे व न्या. डॉ. नीला गोखले**

**राखून ठेवल्याचा दिनांक : ९ एप्रिल २०२५**

**घोषित केल्याचा दिनांक:२४ एप्रिल २०२५**

**न्यायनिर्णय (न्या.डॉ. नीला गोखले.) :-**

१. अपीलकर्त्याने तदर्थ अतिरिक्त सत्र न्यायाधीश, शिवडी, मुंबई यांनी सत्र प्रकरण क्रमांक ७७८/ २००८ मध्ये दिनांक १० डिसेंबर २००९ रोजी दिलेला न्यायनिर्णय आणि आदेशाला आव्हान दिले आहे. त्या आक्षेपित न्यायनिर्णय आणि आदेशानुसार, अपीलकर्त्याला भारतीय दंड संहिता ('आयपीसी'), १८६० चे कलम ३०२ आणि ३९७ अन्वये दंडनीय गुन्ह्यांसाठी दोषी ठरवले गेले आहे. भारतीय दंड संहितेच्या कलम ३०२ अन्वये दंडनीय गुन्ह्यासाठी अनिल वासवानी यांची हत्या केल्याप्रकरणी त्याला जन्मठेप व ३००/- रुपये दंड व दंड न भरल्यास तीन महिने सक्तमजुरी ('आरआय') भोगण्याची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. आयपीसीच्या कलम ३९७ अन्वये दंडनीय गुन्ह्यासाठी त्याला सात वर्षे आरआय(सक्तमजुरी) भोगण्याची शिक्षा आणि ४००/- रुपये दंड व दंड न भरल्यास चार महिने सक्तमजुरीची शिक्षा सुनावली आहे. दोन्ही शिक्षा एकाच वेळी

भोगायच्या आहेत. अपीलकर्ता ११ ऑगस्ट २००८ पासून तुरुंगात आहे आणि त्याने यापूर्वी भोगलेल्या कालावधीसाठी त्याला सूट मिळेल.

२. प्रस्तुतच्या अपिलाची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे.

२.१ फिर्यादी, हर्षा वासवानी (पीडब्ल्यू/१) तिच्या दोन लहान बहिणी आणि वडील, अनिल वासवानी (मयत) यांच्यासोबत खोजा लेन, वर्सोवा, अंधेरी, मुंबई येथे राहत होती. तिची आई पूर्वीच वारली होती. हर्षा आणि तिच्या बहिणी चित्रपटांमध्ये क्राऊड आर्टिस्ट म्हणून काम करत होत्या. कमी भाड्याने जागा मिळाल्याने त्या निवासस्थान बदलण्याच्या तयारीत होत्या. अनिल वासवानी यांनी नवीन घरात स्थलांतरित होण्याच्या उद्देशाने घरगुती सामान पॅकिंगमध्ये मदत करण्यासाठी अपीलकर्त्याची नेमणूक केली होती.

२.२ ३० जुलै २००८ रोजी रात्री ११.३० वाजता अपीलकर्ता अनिलच्या घरी आला. फिर्यादी, तिची बहीण, वडील आणि अपीलकर्ता ३१ जुलै २००८ रोजी पहाटे ४:०० वाजेपर्यंत घरातील सामान पॅक करत होते. ते सकाळी झोपायला गेले; एका खोलीत बहिणी आणि दुसऱ्या खोलीत मृत आणि अपीलकर्ता. दुपारी २:०० वाजता बहिणी उठल्या आणि तयार होऊन ४:३० वाजता घराबाहेर पडल्या. त्यावेळी अपीलकर्ता आणि मृत व्यक्ती घरात एकटेच होते, पॅकिंगमध्ये व्यस्त होते. घराबाहेर पडताना फिर्यादीला

घरमालक भेटले ज्यांनी तिला सांगितले की ते दुसऱ्या दिवशी अनामत रक्कम परत करतील. कामानिमित्त गोरेगाव येथे जात असताना फिर्यादीने तिच्या वडिलांना म्हणजे मृतकाला घरमालकाने अनामत रक्कम परत करण्याबद्दल दिलेल्या आश्वासनाची माहिती देण्यासाठी फोन केला, पण मृतकाने तिचा मोबाईल फोन किंवा लँडलाईन उचलला नाही.

२.३ रात्री ८:३० वाजता घरी परतल्यावर बहिणींना घर उघडे आणि अंधार दिसला. फिर्यादी यांनी बेडरूममधील लाईट चालू केली. तिला अलमारीचे दरवाजे उघडे आणि वस्तू विखुरलेल्या दिसल्या. दागिन्यांचे डबे रिकामे होते आणि मोबाइल गायब होता. त्यांच्या वडिलांचे किंवा अपीलकर्त्याचे कोणतेही चिन्ह नव्हते.

२.४ हॉलमधील लाईट चालू केल्यावर फिर्यादीला हॉलमधील ईशान्य कोपऱ्यात लाल रंगाचे डाग आणि भिंतीजवळ गुंडाळलेली गादी दिसली. तिने गादी हलवली आणि तिचे वडील डोक्याला मार लागल्याने बेशुद्धावस्थेत पडलेले दिसले. त्यामुळे बहिणी घाबरल्या आणि फिर्यादी यांनी एका बहिणीसह जिमी वर्सोवा पोलिस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल केली. पोलिसांनी फिर्यादीचा जबाब नोंदवून घेतला आणि भादंवि कलम ३०७, ३९७ आणि २०१ अन्वये दंडनीय गुन्ह्यांसाठी सीआर क्रमांक २२१/२००८ सह एफआयआर दाखल केला.

२.५ पोलिसांनी घटनास्थळी गेले, पंचांच्या उपस्थितीत पंचनामा केला. मरणान्वेषण पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला. रासायनिक विश्लेषकांनी घटनास्थळी भेट दिली आणि पंचांच्या उपस्थितीत पंचनामा केला. ११ ऑगस्ट २००८ रोजी, पोलिसांना माहिती मिळाली की अपीलकर्ता एशियाड बसने पुण्याला प्रवास करत आहे. पंचांना सोबत घेऊन सापळा रचण्यात आला. दुपारी १२.०५ वाजता पोलिसांनी पंचांच्या उपस्थितीत याचिकाकर्त्याला अटक केली. अर्जदाराची झडती घेतली असता, त्याच्या बॅगेत दोन सोन्याच्या साखळ्या, आठ सोन्याच्या अंगठ्या, हार, सहा पेंडेंट, कानातल्या रिंग, कानातले टॉपस, सोन्याची धातूची गणपती फ्रेम आणि पादुका असे सोन्याचे दागिने असलेले दोन रुमाल आढळून आले. नोकिया कंपनीचा एक मोबाइल ही सापडला होता. त्याच्या पाकिटामध्ये राज्य परिवहन बसचे तिकीट सापडले होते. पंचांच्या उपस्थितीत पोलिसांनी हा माल जप्त केला होता. अपीलकर्त्याला अटक केली होती.

२.६ १२ ऑगस्ट २००८ रोजी, अपीलकर्त्याच्या सांगण्यावरून, अनेक सोनारांच्या दुकानातून सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले. या जप्तीच्या पंचांच्या उपस्थितीत निवेदन पंचनामे तयार करण्यात आले.  त्यानंतर, अर्जदाराच्या सांगण्यावरून, २३ ऑगस्ट २००८ रोजी त्याचे कपडेही जप्त करण्यात आले होते.  पंचांच्या उपस्थितीत

वरील कपडे जप्त करण्याचा पंचनामा तयार करण्यात आला. २ सप्टेंबर २००८ रोजी आर्थर रोड कारागृहात अपीलकर्त्याची ओळख परेड घेण्यात आली होती. साक्षीदारांनी त्याची ओळख पटवली. ३ सप्टेंबर २००८ रोजी, फिर्यादी यांनी पंचांच्या उपस्थितीत जप्त केलेल्या सोन्याच्या दागिन्यांची ओळख पटवली आणि पंचनामा तयार केला. त्यामुळे, तपास पूर्ण झाल्यानंतर महानगर दंडाधिकारी रेल्वे मोबाईल पोर्ट अंधेरी मुंबई यांच्या कोर्टात अपीलकर्त्याविरुद्ध दोषारोपपत्र दाखल करण्यात आले, त्यांनी खटला २४ नोव्हेंबर २००८ रोजी सत्र न्यायालयात वर्ग केला.

२.७ आयपीसीच्या कलम ३०२ आणि ३९७ अन्वये दंडनीय गुन्ह्यांसाठी १९ जानेवारी २००९ रोजी अपीलकर्त्याविरुद्ध दोषारोप निश्चित करण्यात आले. अपीलकर्त्याने 'गुन्हा नाकबूल' केला आणि खटला चालवण्याचा दावा केला.

२.८ त्यांच्या खटल्याच्या समर्थनार्थ, सरकारी पक्षाने १७ साक्षीदार तपासले. बचाव पक्षाने कोणताही पुरावा सादर केला नाही. फौजदारी प्रक्रिया संहिता ('सीआरपीसी'), १९७३ च्या कलम ३१३ अन्वये अपीलकर्त्याचा जबाब नोंदविण्यात आला. अपीलकर्त्याचा बचाव पूर्णपणे नाकबुली, निरपराधीत्व आणि खोटेपणाने गोवल्याचा होता. तथापि, दिनांक १० डिसेंबर २००९ रोजीच्या न्यायनिर्णय व आदेशान्वये विद्वान

तदर्थ अतिरिक्त सत्र न्यायाधीश, शिवरी यांनी अपीलकर्त्याला दोषी ठरवले आणि वरील परिच्छेद क्रमांक १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे शिक्षा ठोठावली.

३. विधी सहाय्य सेवा पॅनेल तर्फे नियुक्त केलेले विद्वान वकील श्री. पवन माळी, यांनी याचिकाकर्त्याच्या वतीने आणि राज्याचे प्रतिनिधित्व करणारे विद्वान अतिरिक्त सरकारी वकील श्री. के. व्ही. सस्ते यांनी बाजू मांडली.

४. अभियोजन पक्षाचे प्रकरण परिस्थितीजन्य पुराव्यांवर आधारित आहे, मुख्यत: शेवटच्या पाहिलेल्या सिद्धांताच्या संदर्भात. अभियोजन पक्षाच्या म्हणण्यानुसार, पीडब्ल्यू /१ ची साक्ष स्पष्टपणे स्थापित करते की मृत आणि अपीलकर्ता हे दोनच लोक, जे शेवटचे मृताच्या घरी दिसले होते. जेव्हा पीडब्ल्यू/१ आणि तिच्या बहिण ३१ जुलै २००८ रोजी दुपारी ४.३० वाजता घरातून बाहेर पडल्या, तेव्हा अपीलकर्ता आणि मृत व्यक्ती घरात उपस्थित होते,घरातील सामानाची बांधाबांध करत होते. रात्री ८.३० वाजता परत आल्यावर त्यांना त्यांचे वडील घरात बेशुद्धावस्थेत दिसले आणि अपीलकर्त्याचा कोणताही पत्ता नव्हता. घरात लुटा लूट झाली होती आणि अलंकार आणि जडजवाहीर गायब असल्याचे निदर्शनास आले होते. अखेरीस, अपीलकर्त्याला पुढील १० दिवसांत अटक करण्यात आली तेव्हा तेच दागिने त्याच्या जवळ सापडले. त्यामुळे, अभियोजन पक्षाचे म्हणणे आहे की अपीलकर्ता आणि मृत व्यक्ती शेवटचे

एकत्र आणि जिवंत पहिले गेले आणि मृत व्यक्तीचा मृत्यू झाल्याचे आढळले या दरम्यानचा वेळेचा फरक इतका कमी आहे की अपीलकर्त्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीने हा गुन्हा केला असण्याची शक्यता जवळजवळ अशक्य आहे.

५. परिस्थितीजन्य पुराव्याचा भाग म्हणून 'शेवटचे एकत्र पाहिले' या सिद्धांतासंबंधीचा कायदा चांगल्या प्रकारे स्थापित आहे. परिस्थितीजन्य पुराव्यांच्या साखळीतील एक दुवा म्हणून 'शेवटचे पाहिलेले' म्हणजे किमान एका साक्षीदाराची तोंडी साक्ष असणे सूचित करेल जेणेकरून मृत व्यक्ती शेवटची अपीलकर्ता/आरोपीच्या सहवासात दिसली होती हे सिद्ध होईल. या संदर्भात माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या पुढील निर्णयांचा संदर्भ घेणे समर्पक ठरेल. उत्तर प्रदेश राज्य विरुद्ध सतीश[1] या प्रकरणात माननीय सर्वोच्च न्यायालयाने या निर्णयाच्या परिच्छेद २२ मध्ये असे म्हटले आहे :-

> "२२. शेवटचे एकत्र पाहिले हा सिद्धांत अशा परिस्थितीत लागू होतो जिथे आरोपी आणि मृत व्यक्ती यांना शेवटचे जिवंत पाहिले गेले आणि मृत व्यक्ती मृतावस्थेत आढळली या दरम्यानचा वेळेचा फरक इतका कमी असतो की आरोपीशिवाय इतर कोणत्याही व्यक्तीने गुन्हा करण्याची शक्यता अशक्य होते. काही प्रकरणांमध्ये हे निश्चितपणे सिद्ध करणे

---
[1]. (२००५)३ एससीसी ११४

कठीण होईल की मृत व्यक्तीला आरोपीसोबत शेवटचे पहिले गेले, जेव्हा दीर्घ कालावधी असतो आणि दरम्यान इतर व्यक्तींच्या येण्याची शक्यता असते. आरोपी आणि मृत व्यक्ती शेवटचे एकत्र पाहिले होते, असा निष्कर्ष काढण्यासाठी इतर कोणतेही सकारात्मक पुरावे नसल्यास, त्या प्रकरणांमध्ये गुन्ह्याच्या निष्कर्षापर्यंत पोहोचणे धोकादायक ठरेल....."

(जोर दिला आहे)

६. या भूमिकेचा पुनरुच्चार माननीय सर्वोच्च न्यायालयाने हात्ती सिंग विरुद्ध हरयाणा राज्य[2] आणि नुकत्याच कृष्ण कुमार आणि अन्य विरुद्ध हरयाणा राज्य[3] या खटल्यात माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयातही केला होता. कृष्णकुमार (सुप्रा) प्रकरणात आरोपीची त्या खटल्यातील वस्तुस्थितीवरून निर्दोष मुक्तता झाली असली, तरी शेवटच्या पाहिलेल्या सिद्धांताशी संबंधित कायदेशीर स्थिती सातत्याने पाळली जाते.

---

[2] ४. (२०२४)१० एससीसी ८१३
५. (२००६)१०एससीसी१७२

७. केवळ परिस्थितीजन्य पुराव्यांवर अवलंबून असलेल्या खटल्यांमध्ये आरोपीच्या दोषासंदर्भात न्यायालयांना निष्कर्षापर्यंत पोहोचण्यासाठी मार्गदर्शक म्हणून काम करणारी प्रमुख तत्त्वे ही माननीय सर्वोच्च न्यायालयाने थोडक्यात सांगितली आहेत. या तत्त्वांना 'पंचशील तत्त्वे' असे संबोधले जाते. करक्कट्टू मोहम्मद बशीर विरुद्ध केरळ राज्य[4] खटल्यात माननीय सर्वोच्च न्यायालयाने रामरेड्डी राजेश खन्ना रेड्डी आणि अन्य विरुद्ध ए.पी.राज्य[5] या खटल्यात ठरवून दिलेल्या तत्त्वांचे पालन केले होते. वरील निर्णयातील परिच्छेद २६ व २७ मध्ये असे म्हटले आहे :-

> “२६. परिस्थितीजन्य पुराव्यांच्या आधारे दोषसिद्धी होण्यासाठी सरकारी पक्षाने सर्व आक्षेपार्ह परिस्थितीचे तुकडे विश्वसनीय आणि सबळ पुराव्याद्वारे सिद्ध केले पाहिजेत आणि अशा प्रकारे सिद्ध झालेल्या परिस्थितीने अशी घटनांची साखळी तयार केली पाहिजे ज्यामुळे आरोपीच्या दोषाशिवाय दुसरा कोणताही निष्कर्ष निघू शकणार नाही. परिस्थिती इतर कोणत्याही गृहीतकावर असू शकत नाही. संशय कितीही गंभीर असला तरी तो पुराव्याला पर्याय ठरू शकत नाही आणि परिस्थितीजन्य पुराव्यांच्या आधारेच आरोपीला दोषी ठरवताना न्यायालये अत्यंत खबरदारी घेतील, हेही सर्वमान्य आहे. [पहा अनिल कुमार सिंह

विरुद्ध बिहार राज्य (२००३) ९ एससीसी ६७ आणि रेड्डी संपत कुमार विरुद्ध आंध्र प्रदेश राज्य (२००५) ७ एससीसी ६०३].

२७. शेवटचा पाहिलेला सिद्धांत अमलात येतो, जिथे आरोपी आणि मृत व्यक्ती शेवटचे जिवंत दिसले आणि मृत व्यक्ती मृतावस्थेत सापडली यातील वेळेचे अंतर इतके कमी आहे की आरोपीशिवाय इतर कोणतीही व्यक्ती गुन्ह्याचा लेखक असण्याची शक्यता अशक्य होते. अशा प्रकरणातही न्यायालयाने काही पुरावे शोधले पाहिजेत."

८. परिस्थितीजन्य पुराव्याच्या प्रकरणाशी संबंधित आणि विशेषत: शेवटच्या पाहिलेल्या सिद्धांतावर आधारित ठरलेला कायदा लागू करून आम्ही सध्याच्या प्रकरणातील वस्तुस्थितीकडे परत येतो. श्री. माळी, यांनी आम्हाला सर्व साक्षीदारांच्या साक्षी मधून घेऊन गेले. ते सादर करतात की साक्षीदारांचे जबाब विचारात घेता, अपीलकर्त्याविरुद्ध कोणताही गुन्हा सर्व वाजवी संशयापलीकडे सिद्ध होत नाही. त्यांच्या म्हणण्यानुसार, ओळख परेड विहित नियमांनुसार घेण्यात आली नव्हती. ते सादर करतात की पहिला आणि सर्वात महत्त्वाचा प्रश्न जो विशेष कार्यकारी अधिकारी (पीडब्ल्यू / ९) ज्यांनी ओळख परेड चाचणी (टीआयपी) घेतली होती त्यांनी विचारायला हवा होता तो म्हणजे साक्षीदार घटनेच्या तारखेपूर्वी अपीलकर्त्याला ओळखत होते की नाही. ते असेही सादर

करतात की परेडसाठी बोलावलेल्या डमींचे स्वरूप अपीलकर्त्याची उंची, वय आणि रंगानुसार सारखे नव्हते.  त्यामुळे टीआयपीच्या वर्तुणुकीवर त्यांचा आक्षेप आहे. दुसरं ते असे सादर करतात की, पीडब्ल्यू/१ ला दागिन्यांशी भावनिक आसक्ती असल्याने ओळख पटवताना समान प्रकारच्या दागिन्यांमध्ये मिसळलेले नसतानाही दागिने ओळखण्याचा दावा तिने केला होता. त्यांनी असा युक्तिवादही केला की अपीलकर्त्याचे कपडे जप्त करणाऱ्या पंचांनी (पीडब्ल्यू/२) उलटतपासणीत सांगितले की, पोलिसांनी त्यांना प्लास्टिक पिशवीत ठेवलेले कपडे दाखवले. त्यामुळे श्री. माळी, असे सादर करतात की कपडे जप्त केल्याचा पुरावा निर्जंतुकीकरण दर्जाचा नाही. अशा प्रकारे, ते असा युक्तिवाद करतात की अपीलकर्त्याचे अपराधी मन (मेन्स रिया) सिद्ध झाले नसले तरी न्यायचौकशी न्यायाधीशांनी अपीलकर्त्याला चुकून खुनाच्या गुन्ह्यासाठी दोषी ठरवले.  अपीलकर्त्याचा अपराध सर्व वाजवी संशयापलीकडे सिद्ध होत नाही आणि म्हणूनच श्री. माळी, या न्यायालयाला अपील मंजूर करण्याची विनंती करतात.

९. श्री. सस्ते, विद्वान अतिरिक्त सरकारी वकील (अति.पी.पी.) यांनीही आम्हाला सर्व १७ साक्षीदारांच्या साक्षी मधून नेले.  त्यांनी सादर केले की अभियोजन पक्षाने सर्व दोषारोप निश्चित करणाऱ्या पुराव्यांचे तुकडे आणि परिस्थितीजन्य पुरावे विश्वासार्ह आणि सबळ पुराव्यांद्वारे स्थापित केले आहेत, ज्यामुळे फिर्यादीने सिद्ध केलेली परिस्थिती

घटनांची एक साखळी तयार होते, जे अपीलकर्त्याच्या गुन्ह्याकडे लक्ष वेधण्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही निष्कर्षास परवानगी देत नाही. त्यामुळे अपील फेटाळून लावावे आणि आक्षेपार्ह न्यायनिर्णय व आदेश कायम करावा, अशी विनंती त्यांनी न्यायालयाला केली आहे.

१०. आम्ही दोन्ही वकिलांचे युक्तिवाद ऐकले आहेत आणि त्यांच्या मदतीने पुराव्याचे अवलोकन केले आहे. फिर्यादीचा पुरावा (पीडब्ल्यू/१) स्पष्ट आणि निर्णायक आहे. ३१ जुलै २००८ रोजी दुपारी ४:३० च्या सुमारास बहिणींसोबत घराबाहेर पडल्यावर तिचे वडील (मृत) आणि अपीलकर्ता घरात होते. त्यानंतर लगेचच तिने वडिलांना फोन करून घरमालकाने डिपॉझिट परत करणे संदर्भात माहिती दिली, तेव्हा तिच्या वडिलांनी मोबाइल किंवा लँडलाईनवर प्रतिसाद दिला नाही. त्यानंतर रात्री ८:३० च्या सुमारास ते परतले असता त्यांना घराचा समोरचा दरवाजा उघडा, दिवे बंद होते, अलमारी उघडी होती, वस्तू घरभर विखुरलेल्या होत्या आणि दागिन्यांचे डबे रिकामे दिसले. तिने स्पष्टपणे सांगितले की, जेव्हा तिने कोपऱ्यातून गादी काढली तेव्हा तिला तिच्या वडिलांच्या डोक्यातून रक्तस्त्राव झालेला दिसला. पीडब्ल्यू/१ ने तिच्या जबाबात हरवलेल्या दागिन्यांचे सविस्तर वर्णन केले होते. जेव्हा अपीलकर्त्याकडून दागिने जप्त केले गेले तेव्हा तिने तेच स्पष्टपणे ओळखले. तिने न्यायालयात अपीलकर्त्याकडे बोट

दाखवून त्याची ओळखही पटवली. तिच्या उलटतपासणीत तिच्याकडून काहीही निष्पन्न होऊ शकले नाही. पीडब्ल्यू/१ च्या जबाबांबाबत दागिन्यांची ओळख पटवण्यासंदर्भात आणि ती आणि तीची बहीण यांनी घर सोडले आणि जेव्हा त्या परत घरी आल्या तेव्हा त्यांना त्यांचे वडील मृत आढळले त्या वेळेतील अंतरा संबंधी कोणतीही सूचना देण्यात आली नव्हती.

११. पीडब्ल्यू/१ ने असे सिद्ध केले आहे की तिचे वडील म्हणजेच मृत आणि अपीलकर्ता शेवटचे एकत्र आणि जिवंत त्यांच्या घरात पहिले होते जेव्हा ती आणि तिच्या बहिणी कामावर निघाल्या होत्या. हे दुपारी ४ वाजता घडले होते आणि ते रात्री ८:३० वाजता परत आले तेंव्हा त्यांना ते मृतावस्थेत आढळले. या कालावधीतील वेळेचे अंतर कमी आहे. या मुद्द्यावर पीडब्ल्यू/१ ची साक्ष ग्राह्य धरण्यासाठी बचाव पक्षाकडून कोणतेही स्पष्टीकरण किंवा सूचना देण्यात आलेली नाही. त्यामुळे शेवटच्या पाहिलेल्या परिस्थितीवरून सिद्ध होते. या पुराव्याला कायदेशीर, सबळ आणि ग्राह्य पुरावे सादर करून इतर पुराव्यांसह योग्य पुष्टी देण्यात आली आहे. वरील पुराव्यांची चर्चा येथे केली आहे.

१२. पीडब्ल्यू/२, पंच, यांनी कपड्यांच्या जप्तीबाबत सांगितले की ते पोलिसांसोबत आणि अपीलकर्त्यासोबत अपीलकर्त्याच्या सांगण्यावरून मसानदेवी मंदिराजवळील सार्वजनिक शौचालयात गेले होते. याचिकाकर्त्याने सार्वजनिक शौचालयाला लागून असलेल्या कच्च्या झोपडीतून प्लास्टिकची पिशवी काढली. बॅगेत हाफ पांढरा टीशर्ट आणि काळ्या रंगाची पूर्ण पॅंट होती. पूर्ण पॅन्टच्या डाव्या गुडघ्याच्या भागावर आणि टी-शर्टच्या ओटीपोटावर तसेच छातीच्या भागावर रक्ताचे डाग होते. अपिलकर्त्याचे हे कपडे पोलिसांनी त्यांच्या उपस्थितीत जप्त केल्याचे त्यांनी स्पष्टपणे नमूद केले आहे. त्याने जप्तीच्या मेमोवर स्वाक्षरी केली आणि त्याची ओळख पटवली. श्री. सस्ते यांनी सी.ए.च्या अहवालाकडे आमचे लक्ष वेधले. निशाण ५८ वरील सी.ए.चा अहवाल हा त्या ठिकाणी सापडलेल्या वस्तूंचा आहे ज्यात उशीचे आवरण, गादी, बेडशीट, 'एल' आकाराचे धातूचे पाईप इत्यादींचा समावेश आहे, जे रक्ताने माखलेले होते. एफएसएलने केलेल्या विश्लेषणाच्या निकालात रक्तगट ‘बी पॉझिटिव्ह’ असल्याचे समोर आले आहे. निशाण ५९ हा अपीलकर्त्याच्या रक्ताने माखलेल्या कपड्यांशी संबंधित सी.ए. अहवाल आहे. या कपड्यांवर सापडलेल्या रक्ताचा रक्तगटही ‘बी पॉझिटिव्ह’ असल्याचे आढळून आले आहे. बचाव पक्षाने एफएसएलच्या आक्षेप घेतलेला नाही.

१३. श्री. माळी यांनी उलटतपासणीत पीडब्ल्यू/२ च्या जबाबाबाबत काही प्रश्न उपस्थित केले जिथे तो म्हणतो की पोलिसांनी प्लास्टिक पिशवीत ठेवलेले कपडे दाखविले. मात्र, श्री. माळी यांनी सोयीस्कररित्या वाक्याचा अर्थ बदलला, ज्यात म्हटले आहे की, पोलिसांनी साक्षीदाराला दाखवलेले कपडे अपीलकर्त्याने स्वत: काढले होते. त्यामुळे माळी यांनी केलेल्या दाव्यानुसार या कथित निष्काळजीपणाकडे लक्ष जात नाही आणि पीडब्ल्यू/२ च्या साक्षीवरूनही कपडे जप्त झाल्याचे सिद्ध होते.

१४. पीडब्ल्यू/३ हा ज्वेलरी शॉप 'वंदना ज्वेलर्स' चा मालक आहे. त्याच्या म्हणण्यानुसार, पोलिसांनी अपीलकर्त्याला त्याच्या दुकानात आणले आणि त्याला विचारले की अपीलकर्त्याने त्याला एक सोन्याची साखळी आणि एक सोन्याची अंगठी विकली आहे का? या साक्षीदाराने अपीलकर्त्याने विकलेली सोन्याची साखळी आणि सोन्याची अंगठी आणि त्याबदल्यात दिलेली पावती ओळखली. त्यांनी सांगितले की, २ ऑगस्ट २००८ रोजी, अपीलकर्ता दागिने विकण्यासाठी त्यांच्या दुकानात गेला होता. या साक्षीदाराच्या वडिलांनी त्याला आईला घेऊन येण्यास सांगितले. त्याची आई आली आणि दागिने तिच्या हातात दिले. हे दागिने पीडब्ल्यू/१ ने तिच्या कुटुंबातील असल्याचे ओळखले. त्यामुळे सोनाराच्या दुकानातून जप्त केलेले दागिने तेच होते, जे अर्जदाराने वासवानी घरातून सोडल्यानंतर विकले होते.

१५. पीडब्ल्यू/४ हा ‘सधन ज्वेलर्स’ नावाच्या दागिन्यांच्या दुकानाचा मालक आहे. त्याने अपीलकर्त्यास ओळखले आणि सांगितले की त्याने एक सोन्याची साखळी रु.२०,०००/- साठी गहाण ठेवली होती. त्याने सोनसाखळी पोलिसांच्या स्वाधीन केली. ही साखळी पीडब्ल्यू/१ नेही ओळखली होती. उलटतपासणीत या साक्षीदाराच्या जबाबाचे खंडन करण्यासाठी कोणतीही सूचना देण्यात आली नाही. त्याच्या उलट तपासणीत त्याच्या साक्षीतून काहीही विसंगत आढळले नाही.

१६. पीडब्ल्यू /५ हे अपीलकर्त्याने सोनाराच्या दुकानातून दागिने जप्त करण्याबाबत दिलेल्या जबाबाचा पंच आहे. त्याने पोलिसांना आणि अपीलकर्त्याला उत्तम डिपार्टमेंटल स्टोअर्स, शिवाजीनगर, पुणे येथे सोबत गेल्याची साक्ष दिली आहे, जिथे काही दागिने गहाण ठेवले होते. तेच दागिने पोलिसांनी त्यांच्या समक्ष जप्त करून सील केले होते. त्याने पंचनामा सिद्ध केला होता. उलटतपासणीत पुन्हा एकदा पीडब्ल्यू/५ च्या विधानांचे खंडन करण्याची सूचना देण्यात आली नाही आणि ती अप्रतिरोधित राहिली. पीडब्ल्यू /६ हा डिपार्टमेंटल स्टोअरचा मालक आहे जिथून गहाण ठेवलेले / तारण ठेवलेले दागिने जप्त केले गेले. त्याने अपीलकर्त्याला दागिने गहाण ठेवणारी व्यक्ती म्हणून ओळखले. ते आपल्या जबाबात आपल्या विधानावर ठाम राहिले आणि उलटतपासणीत काहीही तथ्यात्मक आणि विरोधाभासी समोर आले नाही.

१७. पीडब्ल्यू/७ हा घटनास्थळ पंचनामातील पंच आहे. त्याने अपीलकर्त्याला ओळखले. मात्र, हा साक्षीदार फितूर झाला आणि त्यामुळे सरकारी पक्षाकडून त्याची उलटतपासणी घेण्यात आली. त्यानंतरही या साक्षीदाराने अशी साक्ष दिली की अपिलकर्त्याने पोलिसांना सोनारांच्या दुकानात नेले, जिथे त्याने दागिने विकले होते आणि त्यानुसार ते दागिने जप्त करण्यात आले. पीडब्ल्यू/१ ने ते दागिने आणि गणेशमूर्ती ओळखली.

१८. पीडब्ल्यू/९ हे विशेष कार्यकारी अधिकारी आहेत, ज्यांनी ओळख परेड घेतली. ओळख परेड पंचनामा सिद्ध केला आणि त्याला निशाण क्रमांक- ३९ देण्यात आला. त्यांच्या उलटतपासणीत, त्यांनी टीआयपीचा क्रम सांगितला. तथापि, घटनेच्या तारखेपूर्वी ते अपीलकर्ता / आरोपीला ओळखतात की नाही हे त्यांनी साक्षीदारांना विचारले नाही, असे ते म्हणाले. अपीलकर्त्याची ओळख पटवणाऱ्या इतर सर्व साक्षीदारांच्या जबाबांमध्ये भक्कम पुष्टी आहे आणि या साक्षीदाराने टीआयपीमध्ये भाग घेणाऱ्या साक्षीदारांना विचारले नाही, ते घटनेच्या तारखेपूर्वी अपीलकर्त्याला ओळखतात की नाही, हे अपीलकर्त्याविरुद्धच्या पुराव्यात कोणताही फरक पडत नाही.

१९. पीडब्ल्यू/१२ म्हणजेच घटनेच्या रात्री वर्सोवा पोलिस ठाण्यात ड्युटीवर असलेले पोलिस अधिकारी आणि पीडब्ल्यू/१ आणि तिच्या बहिणींचे जबाब नोंदवणारे आणखी

एक पोलिस निरीक्षक पीडब्ल्यू/१३ यांचे जबाबही अद्याप खंडित झालेले नाहीत. पीडब्ल्यू/१४ हा असा अधिकारी आहे ज्याने दोन पंचांच्या उपस्थितीत एशियाड बसस्थानकावर अपीलकर्त्याला अटक केली. त्याने संपूर्ण घटनेचे तपशीलवार वर्णन केले आहे ज्यामध्ये अपीलकर्त्याच्या बॅगेतील रुमालात सोन्याचे दागिने जप्त केल्याचा समावेश आहे. पुन्हा एकदा त्याच्या उलटतपासणीतून काहीच निष्पन्न झाले नाही. पीडब्ल्यू/१५, हे पोलिस अधिकारी आहेत ज्यांनी जप्त केलेल्या वस्तू रासायनिक विश्लेषणासाठी पाठविल्या होत्या. त्यांनी अपीलकर्त्याच्या सांगण्यावरून अपीलकर्त्याचे कपडे ज्या ठिकाणी ठेवलेले होते आणि जप्त केलेले होते त्यात ठिकाणाबद्दलही साक्ष दिली आहे. त्यांची उलटतपासणीही कोणत्याही खंडनाशिवाय झाली.

२०. आणखी एक महत्त्वाचा पुरावा म्हणजे शवविच्छेदन अहवाल, जो निशान-४३ वर आहे. शवविच्छेदन अहवालाचे साधे वाचन केल्यास तब्बल १९ जखमा दिसून येतात. उजव्या कपाळावर ४ x ३ सेंमी, गोल विखुरलेल्या, अनियमित कडा, भुवयापासून ३ सें.मी. वर आहे. कपाळावर ४ x २ सें.मी.ची जखम देखील आहे, कपाळावर $२^{१/२}$ x १ x १/२ सें.मी.ची जखम आणि कपाळावर आणखी $४^{१/२}$ x १ x १/२ सेंमी जखम आहे. टाळूच्या जखमांमध्ये कपाळाच्या समोरच्या भागावर ८x२x२ सेमी आकाराची कापलेल्या प्रकारच्या जखमा आहेत ज्यामुळे केसांचा कवच चिरडला गेला आहे आणि

कपाळाची हाडे दबल्याचे दर्शवते. डोक्याच्या वरच्या भागावर ३$^{१/२}$ x १$^{१/२}$ x १/२ सें.मी. आकाराची ताऱ्याच्या आकाराची जखम देखील दिसून येते. तिथे पुन्हा हाडे दबल्याचे दिसते. कवटी आणि डोक्याच्या हाडांनाही जखमा आहेत. शवविच्छेदन अहवालात नमूद केलेल्या सर्व जखमा गंभीर स्वरूपाच्या आहेत आणि त्या हेतूपुरस्पर व मृत व्यक्तीला लक्ष्य करून केलेल्या आहेत हे स्पष्ट झालेले आहे. जखमांचे स्वरूपही क्रूर हल्ल्याचे संकेत देते.  या परिस्थितीत हल्ला करणाऱ्याचा मृत्यू घडवण्याचा हेतू अगदी स्पष्ट आहे.

२१. अशा प्रकारे, सरकारी पक्षाने दाखल केलेला वरील पुरावा स्पष्टपणे परिस्थितीची साखळी तयार करतो, प्रत्येक पुरावा अपीलकर्त्याच्या गुन्ह्यातील सहभागाकडे लक्ष वेधतो. शिवाय त्या चार तासात अपिलकर्त्याने मृत व्यक्तीपासून कसे आणि केव्हा वेगळे झाले याबाबत बचाव पक्षाकडून कोणतेही स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. यासंदर्भातील कायद्याचे तत्त्व सर्वमान्य आहे. भारतीय पुरावा कायदा, १८७२ (आयई कायदा) च्या कलम १०६ मधील तरतुदीच असंदिग्ध आणि स्पष्ट आहेत. अशा प्रकारे, जर एखाद्या व्यक्तीला मृत व्यक्तीसोबत शेवटचे पहिले गेले असेल, तर त्याने तो कसा आणि केव्हा विभक्त झाला याचे स्पष्टीकरण दिले पाहिजे. जर त्याने तसे केले तर त्याने आपला भार पार पाडला आहे असे मानले पाहिजे. जर तो त्याच्या विशेष ज्ञानातील

तथ्यांच्या आधारे स्पष्टीकरण देण्यास अपयशी ठरला तर तो आयई कायद्याच्या कलम १०६ द्वारे त्याच्यावर टाकलेला भार पार पाडण्यात अपयशी ठरतो. राजस्थान राज्य विरुद्ध काशीराम[63], या खटल्याच्या निर्णयात माननीय सर्वोच्च न्यायालयाने असे मत व्यक्त केले आहे की, परिस्थितीजन्य पुराव्यावर आधारित असलेल्या प्रकरणात, आरोपी त्याच्यावर टाकलेला भार पार पाडताना वाजवी स्पष्टीकरण देण्यास अपयशी ठरल्यास तो त्याच्याविरुद्ध सिद्ध झालेल्या परिस्थितीच्या साखळीत एक अतिरिक्त दुवा प्रदान करतो. आयई कायद्याचे कलम १०६ फौजदारी खटल्यात शाबितीचा भार एकाकडून दुसऱ्यावर पडत नाही, जो नेहमीच फिर्यादी पक्षावर असतो. यात असा नियम आहे की जेव्हा आरोपी त्याच्या माहितीत असलेल्या आणि त्याच्या निर्दोषतेशी सुसंगत असलेल्या कोणत्याही सिद्धांताचे किंवा गृहीतकाचे समर्थन करू शकत नाही अशा तथ्यांवर कोणताही प्रकाश टाकत नाही, तेव्हा न्यायालय कोणतेही स्पष्टीकरण देण्यात त्याच्या अपयशाला साखळी पूर्ण करणारा अतिरिक्त दुवा मानू शकते. प्रस्तुतच्या प्रकरणात, विद्वान अतिरिक्त.पी.पी. यांच्या युक्तिवादात पुरेसा जोर होता की अपीलकर्त्याला मृतव्यक्तीबरोबर शेवटचे पाहिले गेले होते, त्यामुळे पीडब्ल्यू /१ आणि तिच्या बहिणी घराबाहेर पडल्यानंतर काय घडले हे सिद्ध करण्यासाठी शाबितीची जबाबदारी त्याच्यावर

---

[3]6.२००६(१२) एससीसी २५४

होती, कारण ती वस्तुस्थिती त्याच्या विशेष माहितीत होती. बचाव पक्षाने तिच्या उलटतपासणीत पीडब्ल्यू/१ ला अशी कोणतीही माहिती अस्तित्वात असल्याचे सुचवलेले नाही किंवा अपीलकर्त्याने सीआरपीसीच्या कलम ३१३ अन्वये आपल्या जबाबात यासंदर्भात कोणतेही स्पष्टीकरण दिलेले नाही. बहिणी घराबाहेर गेल्यानंतर तो घराबाहेर पडला असे म्हणणे म्हणजे शाबितीच्या भारापासून मुक्तता मिळण्यास पुरेसे नाही कारण तो निघून गेल्याचा दावा केल्यानंतर त्याचा ठावठिकाणा स्पष्ट करण्यासाठी काहीच नाही, कारण ती तथ्ये फक्त त्याच्या विशेष ज्ञानात होती. अशाप्रकारे असे मानले पाहिजे की तो आयई कायद्याच्या कलम १०६ अन्वये त्यांच्यावर टाकण्यात आलेला भार पार पाडण्यात अयशस्वी ठरला. अपीलकर्ता आणि मृत व्यक्ती शेवटच्या वेळी एकत्र असण्यापासून सुरू होणारी परिस्थितीची साखळी, पूर्णपणे अखंडित असल्याने, अपीलकर्त्याकडून दागिने जप्त करण्यात आले आणि पीडब्ल्यू / १ द्वारे चोरीचे दागिने म्हणून ओळखले गेले, परिस्थितीच्या साखळीत एक संपूर्ण दुवा स्थापित करते, जे वाजवी संशयापलीकडे त्याचा अपराध सिद्ध करते.

२२. अशा प्रकारे, प्रस्तुतचे प्रकरण प्रामुख्याने परिस्थितीजन्य पुराव्यांवर अवलंबून आहे ज्यात अपीलकर्ता आणि मृत घरात एकटेच होते आणि त्यांना शेवटचे जिवंत पाहिले होते; अपीलकर्त्यास अटक केली तेव्हा त्याच्याकडून जप्त केलेले दागिने आणि

अलंकार; त्याच्या सांगण्यावरून जप्त केलेले रक्ताने माखलेले कपडे आणि अपीलकर्त्याच्या सांगण्यावरून सोनाराच्या दुकानातून जप्त केलेले काही दागिने. प्रस्तुतच्या प्रकरणातील वस्तुस्थितीचे सखोल विश्लेषण आणि साक्षीदारांच्या साक्षी, जे ठोस पुरावे आहेत, ते स्पष्टपणे प्रस्थापित परिस्थितीजन्य पुराव्यांवर आधारित अपीलकर्त्याच्या गुन्ह्याच्या सिद्धतेचे 'पंचशील' प्रस्थापित करते. शरद बिर्धीचंद सारडा विरुद्ध महाराष्ट्र राज्य[७] या ऐतिहासिक खटल्यात मांडलेली पाच सुवर्णतत्त्वे, ज्यात 'सिद्ध होऊ शकते' आणि 'सिद्ध झालेच पाहिजे' यामधील कायदेशीर फरक स्पष्टपणे स्थापित केला आहे. प्रस्थापित तथ्ये अपीलकर्त्याच्या गुन्ह्याशी सुसंगत आहेत आणि पुराव्यांची साखळी इतकी परिपूर्ण आहे की अपीलकर्त्याच्या निर्दोषतेशी सुसंगत निष्कर्षासाठी कोणताही वाजवी आधार नाही. सर्व मानवी संभाव्यतेनुसार, मृताच्या हत्येचे कृत्य अपीलकर्त्याने केले आहे.

२३. उपरोक्त चर्चेच्या आधारावर, आमचे मत आहे की येथे आक्षेप घेतलेला न्यायनिर्णय व आदेश हा सुयोग्य व कायदेशीरदृष्ट्या योग्य निर्णय आहे. अभिलेखावरील पुराव्यांचे संपूर्णपणे मूल्यांकन केल्यावर, अपीलकर्त्याचा गुन्हा सर्व वाजवी संशयापलीकडे सिद्ध होतो. न्यायचौकशी न्यायालयाचे शेवटच्या वेळी पाहिलेल्या सिद्धांतासंबंधी आणि तपासलेल्या साक्षीदारांच्या जबाबांच्या विश्वासार्हतेसंबंधीचे

निरीक्षण, तसेच पुष्टी केलेले पुरावे इत्यादी अत्यंत प्रभावी आहेत आणि त्यात कोणत्याही हस्तक्षेपाची आवश्यकता नाही. सरकारी पक्षाने कायदेशीर, ग्राह्य आणि सबळ पुराव्यांच्या आधारे सर्व वाजवी संशयांच्या पलीकडे आपली बाजू सिद्ध केली आहे. त्यामुळे अपील अयशस्वी ठरते आणि त्यानुसार ते खारिज केले जाते. अपीलकर्त्याची उपरोक्त नमूद केलेल्या गुन्ह्यासाठीची दोषसिद्धी आणि शिक्षा कायम ठेवली जाते.

(न्या.डॉ. नीला गोखले.) (न्या.रेवती मोहिते डेरे.)

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

**x-x-x-x**